# राज्यशास्त्र विभाग
## अहवाल २०१७—१८

शैक्षणिक सत्र २०१७—१८ दरम्यान राज्यशास्त्र विभागाचे वतीने खालील सह—शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले.

१) दिनांक २६ नोव्हेंबर २०१७ रोजी संविधान दिवस साजरा करण्यात आला. प्रा. डी. आर. सावळे, प्रा. सुरडकर मॅडम, प्रा. किरण पडघान, प्रा. सोमवंशीख प्रा. अनिल कदम, प्रा. डी. आर. उन्हाळे, व अनेक सहकारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

२) दिनांक १० डिसेंबर २०१७ रोजी जागतिक मानवी हक्क दिन जाणीव व जागृती या स्वरूपात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. एन. बी. भुसारी हे होते, तर प्रमुख उपस्थितीत प्रा. डॉ. गणेश मालटे, विभाग प्रमुख प्रा. डॉ. जे. जे. जाधव हे होते. तिघांनीही विद्यार्थ्यांना मानवी हक्कांची आवश्यकता या अनुषंगाने महत्वपुर्ण मार्गदर्शन केले.

३) राज्यशास्त्र विभागाचे वतीने एम. ए. राज्यशास्त्राचे विद्यार्थी श्री ज्ञानेश्वर बावणे यांची महाराष्ट्र राज्य विधीमंडळाच्या अभ्यास वर्गासाठी निवड करण्यात आली होती. त्यांनी १२ ते १९ डिसेंबर २०१७ या कालावधीत दोन्ही सभागृहाच्या कामकाजाची पध्दती, प्रत्यक्ष कामकाज या अनुषंगाने नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या अभ्यास वर्गात सहभाग घेतला होता. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यास गटाचे सदस्य म्हणून त्यांनी उत्कृष्ट सहभाग नोंदविला.

४) २४ जानेवारी २०१८ रोजी महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाचे वतीने व राज्यशास्त्र अध्ययन व संशोधन मंच जि. बुलडाणा अंतर्गत नोट बंदी देशहितासाठी योग्य आहे काय? या विषयावर जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत १२ महाविद्यालयांनी भाग घेऊन उत्कृष्ट सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गारोडे, परिक्षक म्हणून प्रा. नागेश गायकवाड (एस.पी.एम. महाविद्यालय, चिखली), प्रा. लक्ष्मण शिराळे (विदर्भ कला महाविद्यालय, बुलडाणा) प्रा. डॉ. अनुराधा मुळे (चिखली) यांनी काम पाहिले.

प्रा. डी. आर. उन्हाळे, प्रा. डॉ. कलाखे मॅडम, प्रा. पेंन्शनवार, प्रा. मालटे यांनी सहकार्य केले.

कार्यक्रमास प्रा. ए. के. वाघ, प्रा. डॉ. मिना निकम, प्रा. शालिनी काटोले, प्रा. टोंगसे मॅडम, प्रा. बोबडे, प्रा. सरप, श्री. भोंगे, श्री. सोनुने, श्री. राजु करपे इत्यादीची उपस्थिती लाभली.

५) यापुर्वी १८ ऑगस्ट २०१७ रोजी राज्यशास्त्र अध्ययन व संशोधन मंच जि. बुलडाणा यांच्यावतीने महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा चाचणी घेण्यात आली. यात ७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

६) दि. २५ जानेवारी २०१८ रोजी स्वतंत्र विदर्भ राज्य का पाहिजे ? या विषयावर चर्चासत्राचे व राष्ट्रीय मतदार दिनाचे आयोजन करण्यात आले.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून नागपूर येथील अर्थतज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले, मा. आ. वामनराव चटप हे होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. बी. भुसारी हे होते.

कार्यक्रमास कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे शेवटी श्रमदान करण्याचा निर्धार करणारी सामुहिक शपथ घेण्यात आली.

(प्रा. डॉ. जे. जे. जाधव)
राज्यशास्त्र विभाग प्रमुख